दिनांक 26/06/2025 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.65

विषय – स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी बायोमायनिंग कामाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा. मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख/नोडल ऑफिसर यांची दि. 16/06/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील मंजुरी पत्र क्र. राअस/स्वमअ/621/25-26 दि. 27/05/2025

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या जुन्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून (बायोमायनिंग) या कचऱ्याची विल्हेवाट लावणेसाठी मंजुरी देण्यात आली आहे. संदर्भ क्र. 2 नुसार नगरपरिषद मार्फत अंदाज पत्रक तयार करून त्यास मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तांत्रिक मान्यता घेणेबाबत कळविले आहे.

संदर्भीय पत्रान्वये विटा नगरपरिषदेकडे जुन्या साठलेल्या कचऱ्यापैकी 11650 मेट्रिक टन इतका जुना कचरा सदर कामांतर्गत प्रक्रिया करण्यासाठी मंजूर करण्यात आला आहे. विटा नगर परिषदेने सदर कामाचा प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक तयार केले असून, सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. 64,07,500/- मात्र इतकी होत आहे. सदर प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता मिळणे कामी मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे सादर करणे, तांत्रिक तपासणी शुल्क अदा करणे तसेच तांत्रिक मान्यता मिळालेनंतर सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र नागरी अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी) 2.0 यांचेकडे सादर करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबद्ध कार्यवाही करणेत यावी.

सही/-<br>
( डॉ. विक्रम बांदल )<br>
प्रशासक<br>
विटा नगरपरिषद,विटा